सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
मध्यवर्ती इमारत ,१ बी.जे. रोड , पुणे -४११००१
ई मेल- mlldb२०१६@gmail.com दूरध्वनी क्र.- ०२० २६१२२८४६/४७ विस्तारीत क्र. २१७ ते २१९

जा.क्र.सआ/कृषिपत-10/वि.का. सक्षमीकरण/अर्थसहाय्य/2025 दि : 18 / 08/2025

प्रति,

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
सिंधुदुर्ग, ठाणे, धुळे, पुणे (ग्रामीण), सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, छ. संभाजीनगर, परभणी, हिंगोली, जालना, नांदेड, बीड, वाशिम, अकोला, अमरावती, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर

**विषय: प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण अर्थसहाय्याबाबत.**

**संदर्भ-** 1) शासन निर्णय क्र.सीसीआर0313/प्र.क्र.144/2-स दि.06/09/2014 व शासन शुध्दीपत्रक दि.02/08/2017
2) शासन निर्णय क्र. संकीर्ण- 0919/प्र.क्र.106/18-स, दि.16/11/2021
3) शासन निर्णय क्र. अर्थसं 0525/प्र.क्र.116/18-स, दि.12/08/2025

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

राज्यातील शेतक-यांना पीक कर्ज पुरवठा करण्यासाठी प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांचे महत्व विचारात घेता या संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासनामार्फत पीक कर्ज पुरवठ्याच्या प्रमाणात अर्थसहाय्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार राज्यातील अल्प मुदत सहकारी संरचनेअंतर्गत प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्याबाबत संदर्भिय शासन निर्णय 1 व 2 अन्वये या संस्थांना अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अर्थसहाय्य देण्यात येणा-या प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी/निकषांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

त्यानुसार राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत (STCCS ) प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरणासाठी अर्थसहाय्य (24252515) या योजनेंतर्गत सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पिय रु.100 कोटी (अक्षरी रुपये शंभर कोटी फक्त) इतकी तरतुद मंजूर आहे.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय शासन निर्णय दि.12/08/2025 अन्वये लेखाशिर्ष 24252515 अंतर्गत रू.60 कोटी (अक्षरी रू.साठ कोटी फक्त) एवढ्या निधीचे वितरण करून खर्च करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार विषयांकीत योजनेसाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर यांचे मार्फत प्राप्त मागणीचे अनुषंगाने अनुक्रमे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग, ठाणे, धुळे, पुणे (ग्रामीण), सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, छ. संभाजीनगर,

परभणी, हिंगोली, जालना, नांदेड, बीड, वाशिम, अकोला, अमरावती, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर यांना मागणीनुसार खालील तपशीला प्रमाणे रक्कम उपलब्ध करुन देण्यात येत आहे

**प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण अर्थसहाय्य निधी**
**शासन निर्णय 12/08/2025 नुसार वितरित करावयाची रक्कम**

| अ.क्र. | जिल्हा | आर्थिक वर्ष | संस्था | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | सिंधुदुर्ग | 2020-21 | 51 | 2154577 |
| | | 2021-22 | 81 | 5054149 |
| | | **एकूण** | **132** | **7208726** |
| | | | | |
| 2 | ठाणे | 2020-21 | 53 | 3292583 |
| | | | | |
| 3 | धुळे | 2020-21 | 60 | 1391064 |
| | | 2021-22 | 67 | 2544355 |
| | | **एकूण** | **127** | **3935419** |
| | | | | |
| 4 | पुणे ग्रामीण | 2018-19 | 298 | 22498863 |
| | | 2019-20 | 358 | 25884441 |
| | | 2020-21 | 354 | 29591710 |
| | | **एकूण** | **1010** | **77975014** |
| | | | | |
| 5 | सोलापूर | 2020-21 | 224 | 8983861 |
| | | | | |
| 6 | कोल्हापूर | 2016-17 | 891 | 43480665 |
| | | 2017-18 | 1167 | 53854606 |
| | | **एकूण** | **2058** | **97335271** |
| | | | | |
| 7 | सांगली | 2018-19 | 258 | 17357140 |
| | | | | |
| 8 | सातारा | 2017-18 | 794 | 58011801 |
| | | | | |
| 9 | छ. संभाजीनगर | 2020-21 | 235 | 13474259 |
| | | | | |
| 10 | परभणी | 2020-21 | 196 | 10843625 |
| | | 2021-22 | 379 | 31450277 |
| | | **एकूण** | **575** | **42293902** |
| | | | | |
| 11 | हिंगोली | 2021-22 | 351 | 17939715 |
| | | | | |
| 12 | जालना | 2021-22 | 408 | 14506734 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 2022-23 | 438 | 16607349 |
| | | **एकूण** | **846** | **31114083** |
| | | | | |
| 13 | नांदेड | 2020-21 | 593 | 18719739 |
| | | 2021-22 | 719 | 32508719 |
| | | **एकूण** | **1312** | **51228458** |
| | | | | |
| 14 | बीड | 2017-18 | 91 | 3309196 |
| | | 2018-19 | 51 | 1385127 |
| | | 2019-20 | 68 | 1449298 |
| | | 2020-21 | 260 | 8074264 |
| | | 2021-22 | 450 | 20089048 |
| | | **एकूण** | **920** | **34306933** |
| | | | | |
| 15 | वाशिम | 2017-18 | 419 | 17708676 |
| | | 2018-19 | 418 | 15737566 |
| | | **एकूण** | **837** | **33446242** |
| | | | | |
| 16 | अकोला | 2017-18 | 312 | 14110000 |
| | | 2018-19 | 280 | 13335000 |
| | | **एकूण** | **592** | **27445000** |
| | | | | |
| 17 | अमरावती | 2020-21 | 520 | 22811036 |
| | | | | |
| 18 | गोंदिया | 2019-20 | 239 | 7661549 |
| | | 2020-21 | 219 | 10077005 |
| | | **एकूण** | **458** | **17738554** |
| | | | | |
| 19 | भंडारा | 2020-21 | 252 | 13476932 |
| | | | | |
| 20 | गडचिरोली | 2019-20 | 95 | 3273238 |
| | | 2020-21 | 108 | 3884677 |
| | | **एकूण** | **203** | **7157915** |
| | | | | |
| 21 | चंद्रपूर | 2019-20 | 237 | 13467156 |
| | | | | |
| | | **एकत्रित एकूण** | 11994 | 600000000 |

**(अक्षरी रू. साठ कोटी फक्त)**

सदर योजनेवर वरीलप्रमाणे होणारा रू. 60 कोटी (अक्षरी रू.साठ कोटी फक्त) खर्च हा सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी उपलब्ध तरतुदीमधून पुढील लेखाशिर्षाखाली खर्च करणेत यावा.

मागणी क्रमांक व्ही-2
मुख्य लेखाशिर्ष 2425-सहकार,
195- सहकारी संस्थांना सहाय्य
(01)- सहकारी संस्थांना सहाय्य
(01)(02)- राज्यातील अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत (STCCS प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरणासाठी अर्थसहाय्य (24252515)
33-अर्थसहाय्य (दत्तमत)

अर्थसहाय्य देण्यात येणा-या प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांनी संदर्भ क्र. 1 व 2 मधील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी /निकषांची पुर्तता करणे बंधनकारक आहे. सदर अटी /निकषांची पुर्तता होते किंवा नाही याची खातरजमा संबंधीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी करावी.

आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरील प्रमाणे मंजूर करणेत आलेला निधी संबंधीत संस्थांना वितरीत करुन सदर रक्कमेचे उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्याप्रमाणे कार्यालयाचे विहीत नमुन्यातील रक्कम विनियोग प्रमाणपत्रे तयार करुन राज्याचे महालेखापाल व संबंधीत कोषागार अधिकारी यांना दिल्याची पोहोच घेऊन त्याची एक प्रत शासनास व या कार्यालयास रक्कम आहरित केलेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत सादर करणे आवश्यक आहे.

Co-operation & Registrar Co-operative Commissioner Maharashtra State Pune

(दिपक तावरे, भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत : कार्यवाहीस्तव**

अपर निबंधक, सहकारी संस्था (अंदाज व नियोजन) मुख्यालय, पुणे

त्यांना सूचीत करण्यात येते की, सदर तरतुद संबंधीत संस्थांना अदा करण्यासाठी संबंधीत जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

उक्त तपशीलाप्रमाणे संबंधीत जिल्ह्यांना बिम्स प्रणालीवर रक्कम वितरीत करुन या कार्यासनास अवगत करावे.

**प्रत : उचित कार्यवाहीस्तव**

1) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर
2) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग, ठाणे, धुळे, पुणे(ग्रामीण), सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, परभणी, छ. संभाजीनगर, हिंगोली, जालना, नांदेड, बीड, वाशिम, अकोला, अमरावती, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर
3) कार्यासन अधिकारी (18-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-32

(दिपक तावरे, भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.